उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.मेटे यांचेमार्फत शपथेवर सुरु

०१. मी शासकिय रूग्नालय अंबाजोगाई येथे चतुर्थश्रेणी कर्मचारी व बढती होवुन लिपीक या पदावर नोकरी केलेली आहे. मी ऑगस्ट २०१४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहे तर माझे पती सन २०११ साली सेवानिवृत्त झाले आहेत. हे खरे आहे की, माझे घरामध्ये माझे व माझे पतीच्या व्यतिरीक्त इतर कोणीही नोकरीला नाही. हे खरे आहे की, मी व माझे पती असे दोघे मिळुन सर्व कुटुंबाचा व मुलाच्या शिक्षणाचा खर्च करत होतो. मला सेवानिवृत्ती वेतन र.रू. २०,०००/- मिळते. दोघांच्या सेवानिवृत्ती वेतनातून आमचा खर्च वजा जाता महिन्याकाठी १० ते १५ हजार रूपये शिल्लक राहतात. हे खरे आहे की, माझा मुलगा विशाल याचा शिक्षणाचा सर्व खर्च आम्ही दोघांनी केलेला आहे.

०२. हे खरे आहे की, माझे पतीवर व माझे मुलावर बेकायदेशीर व्याजाने पैसे देतात असे म्हणुन आमच्या घरावर छापा पडलेला होता. हे मला माहीत नाही की, त्यावेळी छापा टाकणा-या अधिकार-यानी कोरे धनादेश, बॉन्ड व इतर काही रजिस्टर जप्त केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१०-२०११ साली माझे पतीने आरोपी बालाजी शिंदे यांना व्याजाने पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१०-२०११ साली आरोपी बालाजी शिंदे माझे पतीला व्याजाने घेतलेल्या पैशापोटी दरमहा र.रू. ५०००/- इतके व्याज देत होता. हे खरे आहे की, आरोपी बालाजी शिंदे हा दर महिना माझे खात्यावर देखील पाच हजार रूपये टाकत होता. हे खरे आहे की, आरोपी बालाजी शिंदे याने माझेकडुन पैसे घेतलेले नव्हते. हे मला माहीत नाही की, आरोपी बालाजी शिंदे याने माझे पतीकडुन घेतलेल्या पैशापोटी सन २०१२ ते सन २०१३ या सालात एकुण र.रू. १,६०,०००/- माझे खात्यावर टाकले होते. हे मला माहीत नाही की, आरोपी बालाजी शिंदे याने माझे पतीच्या नावे असलेल्या खात्यावर देखील दरमहा पाच हजार रूपये टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११-१२ साली आरोपी बालाजी शिंदे याने माझा मुलगा विशाल याला देखील धनादेशाद्वारे पाच पाच हजार रूपये दिलेले आहेत. हे खरे आहे की, बालाजी शिंदे याला र.रू. २,८०,०००/- दिले असा दर्शवणारा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. सन २०१४ ते सन २०१८ साली आम्हाला किती शेत पिक विमा मिळाला हे सांगता येणार नाही. हे माझे लक्षात नाही की, सन २०१४ ते सन २०१७ या काळात दुष्काळी परिस्थीती होती.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.02.09 17:06:46 +0530

हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीने बालाजी याला एक लाख रूपये व्याजाने दिले होते व बालाजीने व्याजासहीत ती सर्व रक्कम माझे पतीला, मुलाला व मला परत केलेली आहे, परंतु पैसे देताना बालाजीकडुन घेतलेल्या को–या धनादेशाचा गैरवापर माझे मुलाने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ साली माझे मुलाने माझे किंवा पतीच्या समक्ष कधीही पैसे बालाजी याला दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, २०१०–११ साली दिलेल्या पैशापोटी घेतलेल्या आरोपीच्या धनादेशाचा गैपवापर माझे मुलाने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक –०९/०२/२०२६

समक्ष,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.02.09 17:06:53 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.02.09 17:06:58 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.